## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४(१) (बी) नुसार १७ बाबींवर प्रसिद्ध करावयाची अंमलबजावणी विभागाची माहिती खालीलप्रमाणे आहे

### कलम (२) एच-नमुना (अ)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विभागवार लोकप्राधिकारी यांची यादी

**महानगरपालिका विभागाचे नांव** : अंमलबजावणी विभाग

कलम २ (एच) a/b/c/d

| अ. क्र. | लोकप्राधिकारी संस्थाचा विभाग | संस्था प्रमुखाचे नांव | ठिकाण / पत्ता |
|---|---|---|---|
| १ | अंमलबजावणी विभाग, नवी मुंबई महानगरपालिका | उप आयुक्त (अंमलबजावणी) | चिकणेश्वर बस डेपोच्या समोर, पहिला मजला, कोपरखैरणे विभाग कार्यालय इमारत, सेक्टर- ६, कोपरखैरणे, नवी मुंबई |

### कलम (२) एच-नमुना (ब)

-- निरंक --

### कलम ४ (१) (बी) (i)

### नवी मुंबई महानगरपालिका येथील अंमलबजावणी विभाग कार्यालयातील कार्ये व कर्तव्ये यांचा तपशिल

| | | | |
|---|---|---|---|
| १) | **कार्यालयाचे नांव** | : | अंमलबजावणी विभाग |
| | **पत्ता** | : | चिकणेश्वर बस डेपोच्या समोर, पहिला मजला, कोपरखैरणे विभाग कार्यालय इमारत, सेक्टर- ६, कोपरखैरणे, नवी मुंबई |
| २) | **कार्यालय प्रमुख** | : | उप आयुक्त (अंमलबजावणी ) |
| ३) | **कोणत्या मंत्रालयीन खात्याच्या अधिनस्त** | : | नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२. |
| ४) | **विभागाचे ध्येय / धोरण** | : | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात मालाच्या होणा-या प्रवेशावर उपकर आकारणी करणे व वसूली करणे |
| ५) | **कामाचे विस्तृत स्वरुप** | : | १. शहराच्या हद्दी बाहेरुन शहराच्या हद्दीमध्ये उपयोग, उपभोग व विक्री यासाठी आयात होणा-या मालावर उपकर वसूली करणे.<br>२. उपकर नियम(३) अन्वये खरेदी/विक्रीची मर्यादा ओलांडली असल्यास उपकर नियम (१३) अन्वये व्यापा-यास नोंदणीकृत करुन घेणे.<br>३. अनोंदित व्यापा-यांचा पाठपुरावा करणे.<br>४. उपकर नियम(२४) अन्वये विवरणपत्र सादर करण्यास भाग पाडणे. |

५. उपकर नियम(२८) अन्वये व्यापा-याचे उपकर दायित्व विहित मुदतीत भरणा करून घेणे.

६. कसुरदार व्यापा-यांचा पाठपुरावा करणे.

७. उपकर नियम(२५) अन्वये उपकरदायित्वाचे मुल्यनिर्धारण करून अतिरिक्त उपकर, शास्ती, व व्याजाची आकारणी करून, वसूली करणे.

८. केलेले मुल्यनिर्धारण यांचे नियम(४३) अन्वये चुकांची दुरूस्ती करणे.

९. चुकीची निर्धारणा झाली असल्यास उपकर नियम(२७) अन्वये पुर्नमुल्यनिर्धारण करणे.

१०. उपकर नियम(४१) अन्वये कसुरदार व्यापा-याकडून दंड व व्याजाची आकारणी करून, वसूली करणे.

११. उपकर नियम(४८) अन्वये शहराच्या हद्दीमध्ये प्रक्रियेसाठी येणा-या मालाच्या संबंधातील लेखापुस्तकांची तपासणी करून उपकराच्या प्रदानातून सुट देणे.

१२. व्यापा-याने उपकर नियम(४९) नुसार उपकर रक्कमेच्या ९०% उपकर परताव्यासाठी मागणी केल्यास लेखापुस्तकांची तपासणी करून परतावा देणे.

१३. उपकर विषयक न्यायालयीन प्रकरणे.

१४. उपकर विभागावर प्रशासकीय नियंत्रण.

१५. उपकर विभागासंबंधी शासनाच्या विविध विभागांच्या संबंधात पत्रव्यवहार.